महाराष्ट्र पोलीस
यवतमाळ पोलीस

# पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ

## प्रेस नोट दिनांक :०२/०५/२०२३

---

## सायबर क्राईम जनजागृतीकरिता यवतमाळ पोलीसांचा अभिनव उपक्रम

### १ मे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधुन शहरातील एस.टी. बसस्टॅन्ड येथे केली जनजागृती

आजच्या या ईंटरनेट युगामध्ये मोबाईल व ईंटरनेट याशिवाय आपले दैनंदिन कामे अशक्य झालेले आहेत. दैनंदिन जिवनातील ब-याचशा बाबी ह्या ऑनलाईन झाल्या असुन सोशल मिडियाचा वाढता वापर यामुळे गुन्हेगारी प्रवृत्ती सुध्दा ईंटरनेट व सोशल मिडिया यासारख्या ऑनलाईन माध्यमांचा वापर करुन ऑनलाईन फ्रॉडचे गुन्हे करीत आहेत. डॉ. पवन बन्सोड, पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी जिल्ह्याची धुरा सांभाळली त्या दिवसापासुन त्यांनी सायबर क्राईमला आळा कसा बसेल व गुन्हे डिटेक्शन यावर विशेष भर दिला आहे. याचाच एक भाग म्हणुन पोलीस अधीक्षक यांचे संकल्पनेतुन 1 मे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधुन सायबर पोलीस स्टेशन यवतमाळ येथील पोलीस अधिकारी व अमंलदार यांनी व्यापक स्वरुपामध्ये सायबर क्राईम जनजागृती करिता सुरवात केली आहे.

सध्या शाळा कॉलेज यांना सुट्या लागत आहेत आणि लग्न सराईचे दिवस असल्याने बस स्टॅन्ड, पेट्रोल पंप व बँका अशा ठिकाणी गर्दी वाढली असुन या ठिकाणी लहान मुलांपासुन ते वयोवृध्दापर्यंत सर्वच वयोगटातील नागरीकांची ये-जा मोठ्या प्रमाणामध्ये आहे. सायबर क्राईम जनजागृती करण्याचा उदात्त हेतू समोर ठेवुन आज दिनांक ०१ मे २०२३ रोजी दुपारी १२ ते १ वाजता या कालावधीमध्ये एस. टी. बस स्टॅन्ड, यवतमाळ येथे सायबर क्राईम जनजागृती करण्यात आली. यामध्ये सायबर पोलीस स्टेशन, यवतमाळ येथील १ अधिकारी व एकुण १० पोलीस अमंलदार यांनी प्रत्यक्ष सहभाग नोदंविला. सायबर क्राईम पासुन कसे सावधान रहावे? याकरिता सायबर पोलीस विभाग, यवतमाळ यांचेवतीने बस स्टॅन्ड वरील प्रवाशांना थोडक्यात माहिती देण्यात येवुन उभ्या असलेल्या बसेसमध्ये जावुन प्रवांशाची जनजागृती होण्यासाठी तयार केलेले वेगवेगळया प्रकारचे एकुण ६०० माहितीपत्रके वाटप करण्यात आले. पोलीस विभागाने बस स्टॅन्डवरिल गर्दीच्या ठिकाणी सुरु केलेल्या या सायबर क्राईम जनजागृती मोहीमेबद्दल प्रवाशांनी समाधान व्यक्त केले आहे. तसेच गर्दीच्या ठिकाणी पोलीसांची हजेरी दिसल्याने पाकिटमार किंवा ईतर घडणारे किरकोळ गुन्हे यांना प्रतिबंध होवुन अशी मोहीम संपुर्ण जिल्ह्यात राबविल्यास नागरिक सायबर क्राईमचे बळी पडणार नाहित. नागिराकांचा सकारात्मक प्रतिसाद पाहता जिल्ह्यातील मोठ्या शहरात असणा-या गर्दिच्या ठिकाणी जावुन सायबर पोलीस ठाणे, यवतमाळ यांचेवतीने जनजागृती करणार आहे.

सदरची सायबर क्राईम जनजागृती मोहीम डॉ. पवन बन्सोड पोलीस अधीक्षक, यवतमाळ, श्री. पियुष जगताप अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस स्टेशन यवतमाळ येथील पोलीस अधिकारी व आमंलदार यांनी पार पाडली.

पोलीस स्टेशन सायबर, यवतमाळ
महाराष्ट्र राज्य

प्रभारी अधिकारी
सायबर पोस्टे., यवतमाळ